# तंत्र शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य,

**३,महापालिका मार्ग, पत्र पेटी क्रमांक १९६७, मुंबई ४०० ००१.**
दूरध्वनी - २२६२०६०१, २२६९०६०२, २२६४११५०/५१, फॅक्स - २२६९२१०२.
E-mail : desk16@dte.org.in Website : www.dtemaharashtra.gov.in

कार्यालयीन आदेश

क्रमांक : १६/आस्था/घबांअ/२०१८-१९/७२१
दिनांक : 19 DEC 2018

पहा : १ शासन ज्ञापन, उच्च व तंत्रशिक्षण विभाग,क्र.अर्थसं-२०१८/प्र.क्र.३९/साशि-१, दिनांक २२/५/२०१८

मुंबई वित्तीय नियम १९५९ (नियम कमांक १३१ ते १४३) व त्यात नमूद केलेल्या सुधारणा, उपरोक्त शासन निर्णय, वित्त विभाग, शासन निर्णय क्रमांक : घबांअ-२०१२/प्र.क्र.३०/२०१२/विनियम, दिनांक २०/०२/२०१५ अन्वये निर्गमित केलेल्या आदेशातील तरतुदीस अनुसरुन संचालक, तंत्रशिक्षण, महाराष्ट्र राज्य, मुंबई हे सोबत जोडलेल्या परिशिष्टात नमूद केलेल्या कर्मचाऱ्यांना नवीन घर बांधण्यासाठी / तयार घर खरेदी तसेच स्वतःच्या मालकीच्या घराचा विस्तार करण्यासाठी / त्यांनी घेतलेल्या कर्जाची परतफेड करण्यासाठी त्यांच्या नावासमोर दर्शविलेली रक्कम घरबांधणी अग्रिम म्हणून उपरोक्त संदर्भ क्रमांक-१ अन्वये शासनाने उपलब्ध केलेल्या अनुदानातून खाली दिलेल्या अटींच्या अधीन राहून मंजूर करीत आहेत.

१. पुढे असेही आदेश देण्यांत येत आहेत की, सदर कर्मचाऱ्यांना खालील कागदोपत्री पुरावा सादर केल्यानंतर मंजूर केलेली अग्रिमाची रक्कम त्यांना अदा करण्यांत यावी.
अ) अग्रिमाची रक्कम परतफेड करण्यासंबंधी विहित फॉर्म ए-२ मध्ये करारपत्र.
ब) नवीन तयार घर खरेदी करिता किंवा जुने तयार घर खरेदी करण्यासाठी मुंबई वित्तीय नियमावली १९५९ मधील परिशिष्ट २६ मधील विहित नमुना बी-४ मध्ये दुय्यम निबंधक यांचेकडे नोंदणी केलेले गहाण खत.
क) घराचे विस्तारीत बांधकाम करण्यासाठी नमुना बी-३ मध्ये दुय्यम निबंधक यांचेकडे नोंदणी केलेले गहाणखत.

२. सदर कर्मचाऱ्यांना मंजूर करण्यांत आलेल्या घरबांधणी अग्रिमाची वसूली त्याचा शिल्लक सेवा कालावधी विचारात घेऊन जास्तीत जास्त १९२ मासिक हप्त्यात करण्यात यावी व तद्नंतर जास्तीत जास्त ४८ हप्त्यात व्याजाची वसुली करण्यांत यावी. मात्र एखादा अधिकारी / कर्मचारी नियत वयोमानानुसार उपरोक्त २४० मासिक हप्ते पूर्ण होण्यापूर्वीच सेवानिवृत्त होणार असेल तर त्याच्या सेवानिवृत्तीपूर्वी संपूर्ण अग्रिमाची व्याजासह वसूली होईल अशाप्रकारे वसूलीचे हप्ते निश्चित करण्यांत यावेत. सदर रक्कमेवरील व्याज शासनाने वित्तीय प्रकाशन १९५९ मधील तरतुदीनुसार व शासन निर्णय क्रमांक : घबांअ-१०९९/ प्र.क्र.२/९९/विनियम, दिनांक ८.७.१९९९ प्रमाणे सदर कर्मचाऱ्याकडून वसूल करण्यांत यावे. जर काही अपरिहार्य कारणास्तव सदर अग्रिमाची संपूर्ण रक्कम परतफेड होऊ शकली नाही तर ती सर्व रक्कम व त्यावरील व्याज त्याच्या स्थावर जंगम मालमत्तेवर लिलाव करुन किंवा शासन ठरवेल त्याप्रमाणे किंवा त्यांना, त्यांच्या वारसदारांना देय असलेल्या मत्यु-नि-सेवानिवृत्ती उपदान किंवा अन्य रकमेतून वसूल करण्यांत यावे. ज्या कर्मचाऱ्यांना अग्रिम दोन हप्त्यात (पार्ट पेमेंट) मंजूर केले आहे त्यांचेकडून एकूण मुद्दल रकमेवर हप्ते बसवून मुद्दल रकमेची वसूली करावी. मुद्दल रकमेचा पहिला हप्ता सदर कर्मचाऱ्यांना अग्रिम रक्कम मंजूर केल्यानंतरच्या लगतच्या महिन्याच्या वेतनातून वसूल करण्यांत यावा. तसेच व्याजाची वसूली मुद्दल रक्कम वसूल झाल्यानंतर लगतच्या महिन्यापासून सुरु करावी.

३. शासन वित्त विभाग परिपत्रक क्र. विमासं-१०९०/प्र.क्र.३४५/९०/लेपवि, दिनांक ६ फेब्रुवारी, १९९१ अन्वये विमा संचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचेकडे स्वखर्चाने घराचा विमा उतरविण्यांत यावा व पुढील कालावधी संपण्यापूर्वी १५ दिवस अगोदर विमा हप्ता भरणे आवश्यक आहे. **अन्य कंपनीकडून घराचा विमा उतरविल्यास तो मान्य करता येणार नाही याची**

**संबंधितांनी नोंद घ्यावी.** घराच्या उतरविलेल्या विम्याच्या पॉलीसीची प्रत संबंधित संस्था / कार्यालय प्रमुखांकडे सादर करण्यांत यावी.

४. त्याचप्रमाणे सदर कर्मचाऱ्यांनी घेतलेले घर / बांधलेले घर / खरेदी केलेले घर वेळोवेळी दुरुस्त करुन चांगल्या स्थितीत ठेवणे आवश्यक आहे. **तसेच त्यांनी घराचा विमा हप्ता, नगरपालिका कर इत्यादी विहित मदतीत भरुन त्याची पावती संबंधित संस्था / कार्यालय प्रमुखांकडे सादर करावी.**

५. सदर कर्मचारी जर अस्थायी कर्मचारी असतील तर त्यांनी त्यांच्यापेक्षा वरिष्ठ स्थायी कर्मचारी जामीन म्हणून शासनाने विहित फॉर्म-सी मध्ये अग्रिम घेण्यापूर्वी बॉण्ड भरुन घेणे आवश्यक आहे किंवा स्थायी कर्मचाऱ्यांचा जामीन देण्यांत यावा. (ज्या कर्मचाऱ्यांची अग्रिम परतफेड करण्याची ऐपत आहे) तसेच अग्रिम ज्या कारणासाठी मंजूर करण्यांत आला आहे त्या कारणासाठीच खर्च केल्याचा लेखी पुरावा त्यांनी तीन महिन्याच्या आत हया कार्यालयास सादर करावा. सदर कर्मचा-यांनी खालीलप्रमाणे हमीपत्र सादर करावे.

> **"मी घेतलेले अग्रिम मी खर्च केलेल्या रक्कमेपेक्षा जास्त असेल तर जास्त रक्कम शासनास ताबडतोब परत करीन. जर हमीपत्राप्रमाणे जास्त रक्कम शासनास जमा केली नाही तर माझ्याकडून कायदेशीररीत्या संपूर्ण येणे रक्कम एक रक्कमी वसूल करण्यांत यावी."**

६. घर बांधण्यासाठी ज्या अर्जदारांना अग्रिम मंजूर करण्यांत आले आहे, त्याबाबत मुंबई वित्तीय नियम १९५९ नियम क्रमांक १३४ परिशिष्ट २६ पोटनियम ६ (ई) आणि महाराष्ट्र शासन राजपत्र वित्त विभाग क्र.एलबीए/१०७१/ २५१०/एफवाय, दिनांक १.३.१९७२ व शासन निर्णय क्र.घबांअ/१०८७/४६५/ विनियम, दिनांक ६.११.१९९० अन्वये निर्गमित केलेल्या आदेशाचे काटेकोरपणे पालन करण्यांत यावे. संबंधित खरेदी केलेले किंवा बांधलेल्या घरासंबंधी मालकी हक्कासंबंधी कागदपत्रे तपासून व प्रमाणित केल्यानंतर सदर अग्रिमाची रक्कम संबंधितास अदा करावी.

७. अग्रिमाचे धन मंजूर करण्याबाबतचे नियमन करणाऱ्या मुंबई वित्तीयनियम १९५९ प्रकरण ११ व अपेंडिक्स २६ मधील तरतुदीचे काटेकोरपणे पालन करावे.

८. अग्रिमाची उचल करावयाची नसल्यास मुंबई वित्तीय नियम १३३ (५) ला अनुसरुन तत्संबंधी माहिती तात्काळ या कार्यालयास सादर करावी.

**९. सदर कर्मचाऱ्यांना मंजूर करण्यांत आलेले अग्रिम ज्या प्रयोजनाकरीता मंजूर केले आहे त्याकरीता त्याचा विनियोग न केल्यास किंवा अग्रिम व व्याज परतफेडीच्या संदर्भातील अटी व शर्तीचे पालन न केल्यास किंवा त्यात कोणत्याही प्रकारची कसूर झाल्यास कसुरदाराकडून अग्रिमाची रक्कम प्रचलित व्याजदरापेक्षा २.७५ प्रतिशत जास्त दराने दंडनीय व्याजाची आकारणी करुन, दंडनीय व्याजासह अग्रिमाची रक्कम एकरकमी वसूल करण्यांत येईल.**

~~१०. घरबांधणी अग्रिमाकरीता शासन वेळोवेळी विहित करेल त्या दराने व्याजाचे दर लागू राहतील.~~

**११. पती, पत्नी दोघेही शासकीय कर्मचारी असले तरीही त्यापैकी एकालाच (विहित मर्यादेतच) घरबांधणी अग्रिम अनुज्ञेय राहील.**

१२. अग्रिम मंजूरीच्या आदेशाची त्याचप्रमाणे अग्रिमाची वसूली पूर्ण झाल्यानंतर संबंधित संस्था / कार्यालय प्रमुखांनी त्याबाबतची नोंद संबंधितांच्या सेवा पुस्तकात करण्यांत यावी.

१३. संबंधित कर्मचाऱ्यांना नियत वयोमानानुसार / स्वेच्छानिवृत्तीने निवृत्त झाल्यास अथवा त्यांचा अकाली मृत्यु झाल्यास त्यांना मंजूर केलेल्या घरबांधणी अग्रिमाची तसेच अग्रिमावरील व्याजाची वसूली पूर्णपणे झाली नसल्यास, त्यांना देय असणाऱ्या मत्यु-नि-सेवा उपदानातून किंवा इतर देय असलेल्या रक्कमेतून समायोजित करण्यांत येईल.

१४. शासन निर्णय, समाजकल्याण विभाग क्रमांक : एजीएस-१०६९, दिनांक १५.११.१९६९ रोजी निर्गमित करण्यांत आलेल्या परिपत्रकातील सूचनांचे काटेकोरपणे पालन करण्यांत यावे.

या कारणासाठी होणारा खर्च "उच्च व तंत्रशिक्षण विभाग-मागणी क्रमांक डब्ल्यू-९-७६१०, शासकीय कर्मचारी इत्यादींना कर्जे-(००) २०१, (००)(०१) घरबांधणी अग्रिमे (७६१० १५२ १)" ५५ आगाऊ रक्कम या शिर्षाखाली चालू वर्षी म्हणजेच सन २०१८-१९ साठी अर्थसंकल्प वितरण प्रणालीमध्ये उपलब्ध असलेल्या अनुदानाप्रमाणे खर्ची टाकण्यांत यावा. सदर देयके लवकरात लवकर पारीत करुन घेण्यांत यावेत.

( डॉ. अभय वाघ )
संचालक तंत्रशिक्षण, महाराष्ट्र राज्य, मुंबई

प्रत माहिती व पुढील योग्य त्या कार्यवाहीसाठी सादर :-

१. अधिदान व लेखा अधिकारी, अधिंदान व लेखा कार्यालय, मुंबई ( **संबंधित संस्था प्रमुखांमार्फत** )
२. कोषागार अधिकारी, कोषागार कार्यालय, कराड/ नागपूर / औरंगाबाद / अमरावती / चंद्रपूर / मिरज / ब्रम्हपूरी / जिंतूर / यवतमाळ / अमरावती / जळगाव / अहमदनगर / खामगाव / नांदेड / उस्मानाबाद / पुणे / नंदुरबार / गडचिरोली / मुर्तिजापूर /मालवण / कोल्हापूर / रत्नागिरी **(मानार्थ) ( संबंधित संस्था प्रमुखांमार्फत )**
३. उप कोषागार अधिकारी, उप कोषागार कार्यालय, आंबेगाव (घोडेगाव)**(मानार्थ) ( संबंधित संस्था प्रमुखांमार्फत )**
४. सहसंचालक, तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, नागपूर / नाशिक / पुणे / मुंबई / औरंगाबाद / अमरावती यांना कळविण्यांत येते की, त्यांच्या विभागांतर्गत वाटप करण्यांत आलेले अनुदान खर्ची पडल्याबाबतची (देयकाचा कोषागार प्रमाणक क्रमांक व दिनांक) माहिती या संचालनालयास तात्काळ पाठविण्यांत यावी.
५. प्राचार्य, शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालय, कराड / औरंगाबाद / नागपूर / चंद्रपूर /अमरावती
६. प्राचार्य, शासकिय अभि.महाविद्यालय, अवसरी, (खुर्द)
७. प्राचार्य, शासकीय तंत्रनिकेतन, मिरज / ब्रम्हपूरी / औरंगाबाद / जिंतूर / अवसरी / यवतमाळ / अमरावती / कराड / जळगाव / अहमदनगर / खामगाव / नांदेड / उस्मानाबाद / नागपूर / पुणे / नंदूरबार / गडचिरोली /मुर्तिजापूर / मालवण /कोल्हापूर / रत्नागिरी / मुंबई

अ. क्र. ४ ते ७ यांना कळविण्यात येते की, अनुदान खर्ची पडल्यानंतर लगेचच त्याबाबतचा तपशिल (देयकाचा कोषागार प्रमाणक क्रमांक व दिनांक) संबंधित विभागीय कार्यालयास तात्काळ पाठविण्यांत यावा.

८. महालेखापाल, (लेखा परीक्षा), महाराष्ट्र राज्य, मुंबई / नागपूर
९. संचालक,विमा संचालनालय, म्हाडा बिल्डिंग (गृहनिर्माण),पहिला मजला, खो.क्र. २६४, वांद्रे (पूर्व), मुं-५१.
१०. संबंधित अधिकारी / कर्मचारी. (संबंधित संस्था / कार्यालयप्रमुखामार्फत)
११. कार्यासन क्रमांक-१५ /४ मुख्य कार्यालय, मुंबई.

19 DEC 2018

(कार्यालयीन आदेश क्रमांक : १६/आस्था/घबांअ/२०१८-१९/७२१, दिनांक 19 DEC 2018 सोबतचे परिशिष्ट )

-: घरबांधणी अग्रिम २०१८-२०१९ :-

| अ. क्र. | अधिकारी / कर्मचाऱ्याचे नाव | पदनाम | संस्था / कार्यालयाचे नांव | मंजूर अग्रिम रक्कम (रुपये) |
|---|---|---|---|---|
| १ | श्री. विनोद मारुती पवार | वरीष्ठ लिपिक | शासकीय तंत्रनिकेतन, मालवण | रुपये२०,००,०००/- पैकी २रा व अंतिम हप्ता रुपये १,३७,७९०/- |
| २ | श्री. विनोद रमेश फलमारी | अधि.संगणक | शासकीय तंत्रनिकेतन, मिरज | ४५,५०,०००/- |
| ३ | श्री. युवराज प्रेमसिंग चौहान | अधि.प्लॅस्टीक ॲण्ड पॉलीमर | शासकीय तंत्रनिकेतन, मिरज | १८,००,०००/- |
| ४ | श्री. अशोक अंबू पावबाके | वाहनचालक | शास. अभि.व संशोधन महाविद्यालय,अवसरी (खुर्द) | १४,००,०००/- |
| ५ | श्री. गोपालकृष्णा रा. पाटील | प्रयोगशाळा सहा. | शासकीय अभि. महाविद्यालय, कराड | ९,६५,०००/- |
| ६ | श्री. शैलेंद लक्ष्मीकांत टोंगसे | वरीष्ठ लिपिक | शासकीय अभि. महाविद्यालय, नागपूर | १७,००,०००/- |
| ७ | श्री. मुकेश विजयसिंह जाधव | हमाल | शासकीय तंत्रनिकेतन, ब्रम्हपुरी | १८,००,०००/- |
| ८ | श्री. केंगले तुकाराम विठ्ठल | प्रयोगशाळा परीचर | शासकीय तंत्रनिकेतन, अवसरी (खुर्द) | १३,८२,०००/- |
| ९ | श्री. शैलेंद्र गो. गजभिये | अधि. यंत्र | शासकीय तंत्रनिकेतन, ब्रम्हपुरी | २८,००,०००/- |
| १० | श्री. शशिकांत महादु बनकर | अधि. संगणक | शासकीय तंत्रनिकेतन, औरंगाबाद | २३,११,०००/- |
| ११ | श्री. आर. सी. वाकेकर | हमाल | शासकीय अभि. महाविद्यालय, औरंगाबाद | १२,१०,०००/- |
| १२ | श्री. व्ही. टी. आटोळे | अधि. स्थापत्य | शासकीय तंत्रनिकेतन, ब्रम्हपूरी | २०,००,०००/- |
| १३ | श्री. एस. जी. आढे | वीजतंत्री | शासकीय तंत्रनिकेतन, जिंतूर | २०,००,०००/- |
| १४ | श्री. शेख गयास अब्दुलवहाब | तांत्रिक प्रयोगशाळा सहा. | शासकीय तंत्रनिकेतन, अवसरी (खुर्द) | १५,००,०००/- |
| १५ | श्री. एल. एल. कुमारवाड | सहाय्यक प्राध्यापक | शासकीय अभि. महाविद्यालय, कराड | १०,००,०००/- |
| १६ | श्री. एस. एब्ल्यू. उईके | वरीष्ठ लिपिक | शासकीय तंत्रनिकेतन, यवतमाळ | १५,००,०००/- |
| १७ | श्री. एम. बी. सावरकर | अधि.रसायन अभियांत्रिकी | शासकीय तंत्रनिकेतन, यवतमाळ | १७,३०,०००/- |
| १८ | श्रीमती अर्चना वामनराव भादे | सहाय्यक प्राध्यापक | शासकीय अभि. महाविद्यालय, अमरावती | ३०,००,०००/- |
| १९ | श्री. गजानन किसनराव धोंगडे | अधि. यंत्र | शासकीय तंत्रनिकेतन, अमरावती | ३०,००,०००/- |
| २० | श्री.सागर अंकुश बोरकर | कनिष्ठ लिपिक | शासकीय तंत्रनिकेतन, कराड | १७,५५,०००/- |
| २१ | श्री. एस. एल.गवळी | हमाल | शासकीय तंत्रकिनेतन,औरंगाबाद | १४,९४,०००/- |
| २२ | श्री. योगेश विठ्ठल अढांगळे | प्रयोगशाळा सहा. | शासकीय तंत्रनिकेतन, जळगाव | १६,५०,०००/- |
| २३ | श्री. संदिप पोपटराव पालवे | अधि. इंग्रजी | शासकीय तंत्रनिकेतन, अहमदनगर | ५०,००,०००/- |
| २४ | श्रीमती बी.बी. ढेकळे | वरीष्ठ लिपिक | शासकीय तंत्रनिकेतन, कराड | १६,९६,०००/- |
| २५ | श्री. बी. आर. होनाळे | हमाल | शासकीय तंत्रनिकेतन, खामगाव | ११,६०,०००/- |
| २६ | श्री. संतोष राजाराम मुधोळकर | अधि. इंग्रजी | शासकीय तंत्रनिकेतन, नांदेड | २४,७१,०००/- |
| २७ | श्रीमती उज्वला विकास डोंगरे | सहाय्यक प्राध्यापक | शासकीय अभि. महाविद्यालय, अमरावती | ३०,००,०००/- |
| २८ | श्री. दिपक मनोहरराव शिंदे | अधि. यंत्र | शासकीय तंत्रनिकेतन, उस्मानाबाद | २०,००,०००/- |
| २९ | श्री. महेश फुलचंद सोळुंके | अधि. संगणक | शासकीय तंत्रकिनेतन, अहमदनगर | २०,००,०००/- |
| ३० | श्री. डी. जे. घोडे | अधि. यंत्र | शासकीय तंत्रनिकेतन, नागपूर | ३०,००,०००/- |
| ३१ | श्री. गौतम सिताराम जगताप | शिपाई | शासकीय तंत्रनिकेतन, पुणे | ७,२१,०००/- |
| ३२ | श्री. शेखर अशोक रावलकर | प्रयोगशाळा परीचर | शासकीय तंत्रनिकेतन, नंदुरबार | १३,५८,०००/- |
| ३३ | श्रीमती सुनिता भ. गेडाम | कनिष्ठ लिपिक | शासकीय तंत्रनिकेतन, गडचिरोली | १४,००,०००/- |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| ३४ | श्री. भरत सिताराम रसाळ | हमाल | शासकीय तंत्रनिकेतन, पुणे | ८,५३,०००/- |
| ३५ | श्रीमती विजया ना. सदार | प्रबंधक | शासकीय तंत्रनिकेतन, मुर्तिजापूर | २९,००,०००/- |
| ३६ | श्री. किरण शामराव ठेकेदार | अधि. यंत्र | शासकीय तंत्रनिकेतन, ब्रम्हपुरी | ३०,००,०००/- |
| ३७ | श्री. एन. सी. बसेना | वरीष्ठ लिपिक | शासकीय तंत्रनिकेतन, नागपूर | १७,००,०००/- |
| ३८ | श्री. ए. व्ही. खेडकर | हमाल | शासकीय तंत्रनिकेतन, नागपूर | १२,००,०००/- |
| ३९ | श्री. सुनिल मोहन अहिरे | यंत्रकारागीर | शासकीय तंत्रनिकेतन, मालवण | १८,००,०००/- |
| ४० | श्रीमती ज्योती विजय निळकंठ | वीजतंत्री | शासकीय तंत्रनिकेतन, कोल्हापूर | १७,८८,०००/- |
| ४१ | श्री. आर. एन. डुबे | अधि औषधनिर्माणशास्त्र | शासकीय तंत्रनिकेतन, रत्नागिरी | २३,००,०००/- |
| ४२ | श्री.डी. एम. कोवे | उपकरण यांत्रिकी | शासकीय तंत्रनिकेतन, यवतमाळ | २०,००,०००/- |
| ४३ | श्री.डी. एस. मोरे | कनिष्ठ लिपिक | शासकीय तंत्रनिकेतन,जळगाव | १०,००,०००/- |
| ४४ | श्री. आय. ए. शेख | नाईक | शासकीय अभि. महाविद्यालय, चंद्रपूर | १४,००,०००/- |
| ४५ | श्री. एस. सी. जोशी | कनिष्ठ लिपिक | शासकीय तंत्रनिकेतन, औरंगाबाद | १४,५०,००० /- |
| ४६ | श्री. अनिल पांडूरंग मरभळ | तांत्रिक प्रयोगशाळा सहाय्यक | शासकीय तंत्रनिकेतन, मुंबई | २७,३५,०००/- |
| ४७ | श्री. नितीन कोडबाजी रतनवार | प्रबंधक | शासकीय तंत्रनिकेतन, यवतमाळ | ३०,००,०००/- |
| ४८ | श्री. जितेंद्र रामदासजी निखाडे | विभाग प्रमुख | तंत्रशिक्षण विभागिय कार्यालय, मुंबई | ५०,००,०००/- |
| ४९ | श्री. रघुनाथ शंकर गोरे | अधि. यंत्र. अभि. | शासकीय तंत्रनिकेतन, उस्मानाबाद | रुपये २०,००,०००/- पैकी १ ला हप्ता रु. ११,१७,२१०/- |
| | ( रुपये नऊ कोटी सत्त्याहत्तर लाख चौतीस हजार मात्र ) | | | ९,७७,३४,०००/- |

उपरोक्त परिशिष्टास अनुसरुन संस्था / कार्यालयांना खालीलप्रमाणे अनुदान सुपूर्द करण्यांत येत आहे. त्यांना कळविण्यांत येते की, परिशिष्टात नमूद केलेली रक्कम संबंधित कर्मचाऱ्यांना प्रदान करण्यांत यावी व तत्संबंधीची माहिती या संचालनालयास तात्काळ पाठविण्यांत यावी.

**घरबांधणी अग्रिम वाटप केलेले अनुदान (सन २०१८-१९)**

| अ.क्र. | कार्यालयाचे नांव | अनुदान रक्कम (रुपये) |
|---|---|---|
| १ | सहसंचालक, तंत्र शिक्षण विभागीय कार्यालय, मुंबई | ५०,००,०००/- |
| २ | प्राचार्य, शासकिय अभि.महाविद्यालय, अवसरी, (खुर्द) | १४,००,०००/- |
| ३ | प्राचार्य, शासकिय अभि.महाविद्यालय, कराड | १९,६५,०००/- |
| ४ | प्राचार्य, शासकिय अभि.महाविद्यालय, नागपूर | १७,००,०००/- |
| ५ | प्राचार्य, शास.अभि.महाविद्यालय, औरंगाबाद | १२,१०,०००/- |
| ६ | प्राचार्य, शास.अभि.महाविद्यालय, अमरावती | ६०,००,०००/- |
| ७ | प्राचार्य, शासकिय अभि.महाविद्यालय, चंद्रपूर | १४,००,०००/- |
| ८ | प्राचार्य, शासकीय तंत्र निकेतन, मिरज | ६३,५०,०००/- |
| ९ | प्राचार्य, शासकीय तंत्र निकेतन, ब्रम्हपूरी | ९६,००,०००/- |
| १० | प्राचार्य, शासकीय तंत्र निकेतन, औरंगाबाद | ५२,५५,०००/- |
| ११ | प्राचार्य, शासकीय तंत्र निकेतन, जिंतूर | २०,००,०००/- |
| १२ | प्राचार्य, शासकीय तंत्र निकेतन, अवसरी (खुर्द) | २८,८२,०००/- |

| अ.क्र. | कार्यालयाचे नांव | अनुदान रक्कम (रुपये) |
|---|---|---|
| १३ | प्राचार्य, शासकीय तंत्र निकेतन, यवतमाळ | ८२,३०,०००/- |
| १४ | प्राचार्य, शासकीय तंत्र निकेतन, अमरावती | ३०,००,०००/- |
| १५ | प्राचार्य, शासकीय तंत्र निकेतन, कराड | ३४,५१,०००/- |
| १६ | प्राचार्य, शासकीय तंत्र निकेतन, जळगाव | २६,५०,०००/- |
| १७ | प्राचार्य, शासकीय तंत्र निकेतन, अहमदनगर | ७०,००,०००/- |
| १८ | प्राचार्य, शासकीय तंत्र निकेतन, खामगाव | ११,६०,०००/- |
| १९ | प्राचार्य, शासकीय तंत्र निकेतन, नांदेड | २४,७१,०००/- |
| २० | प्राचार्य, शासकीय तंत्र निकेतन, उस्मानाबाद | ३१,१७,२१०/- |
| २१ | प्राचार्य, शासकीय तंत्र निकेतन, नागपूर | ५९,००,०००/- |
| २२ | प्राचार्य, शासकीय तंत्र निकेतन, पुणे | १५,७४,०००/- |
| २३ | प्राचार्य, शासकीय तंत्र निकेतन, नंदुरबार | १३,५८,०००/- |
| २४ | प्राचार्य, शासकीय तंत्र निकेतन, गडचिरोली | १४,००,०००/- |
| २५ | प्राचार्य, शासकीय तंत्र निकेतन, मुर्तिजापूर | २९,००,०००/- |
| २६ | प्राचार्य, शासकीय तंत्र निकेतन, मालवण | १९,३७,७९०/- |
| २७ | प्राचार्य, शासकीय तंत्र निकेतन, कोल्हापूर | १७,८८,०००/- |
| २८ | प्राचार्य, शासकीय तंत्र निकेतन, रत्नागिरी | २३,००,०००/- |
| २९ | प्राचार्य, शासकीय तंत्र निकेतन, मुंबई | २७,३५,०००/- |
| ( रुपये नऊ कोटी सत्त्याहत्तर लाख चौतीस हजार मात्र ) | | ९,७७,३४,०००/- |

( डॉ. अभय वाघ )
संचालक, तंत्रशिक्षण, महाराष्ट्र राज्य, मुंबई.

# महाराष्ट्र शासन

क्रमांक : अर्थसं-२०१८/प्र.क्र.३९/साशि-१
उच्च व तंत्रशिक्षण विभाग,
हुतात्मा राजगुरु चौक, मादाम कामा मार्ग,
मंत्रालय विस्तार इमारत, मुंबई ४०००३२
दिनांक : २२ मे, २०१८

तंत्रशिक्षण संचालनालय, मुंबई
नोंदणी क्र. 462
दिनांक 11.6.2018
कार्यासन क्र. १६

**विषय :- सन २०१७-१८ या आर्थिक वर्षातील मंजूर तरतूदीचे वितरण W-९, ७६१०- शासकीय कर्मचारी ई. कर्जे**

संदर्भ : १. वित्त विभाग परिपत्रक क्रमांक : अर्थसं-२०१८/प्र.क्र.६९/अर्थ-३, दि. ०२ एप्रिल, २०१८

<u>ज्ञापन</u>:- उच्च व तंत्रशिक्षण विभागातील (खुद्द विभाग व विभागांतर्गत क्षेत्रिय कार्यालये) शासकीय कर्मचाऱ्यांना घर विकत घेणे / बांधणे, मोटार वाहने, इतर वाहने खरेदी करणे व संगणक खरेदी करणे या करीता मागणी क्रमांक डब्ल्यू-९, प्रधान लेखाशिर्ष-७६१०, शासकीय कर्मचारी इत्यादींना कर्जे या लेखाशिर्षांतर्गत सन २०१८-१९ या आर्थिक वर्षाकरीता एकूण रुपये रुपये ३२,५८,३६,०००/- (रुपये बत्तीस कोटी अठ्ठावन्न लक्ष छत्तीस हजार फक्त) एवढी तरतूद करण्यात आलेली आहे.

२. वित्त विभागाच्या दिनांक ०२ एप्रिल, २०१८ च्या परिपत्रकान्वये "महाराष्ट्र विनियोजन विधेयक, २०१८" यास विधानमंडळाने मंजूरी दिली असून त्यास मा. राज्यपाल यांनी अधिसंमती दिलेली असून ते २०१८ चा महाराष्ट्र अधिनियम क्र. २२ म्हणून महाराष्ट्र राजपत्र असाधारण भाग-४, दिनांक २७ मार्च, २०१८ मध्ये प्रसिध्द झाले आहे. त्यानुसार या मुख्यशिर्षाखालील वित्तीय वर्ष २०१८-१९ च्या एकूण अर्थसंकल्पीत तरतूदीच्या ७० टक्केच्या मर्यादेत तरतूद सन २०१८-१९ च्या प्रथम नऊमाहीकरिता (डिसेंबर, २०१८ अखेर) खर्चासाठी बी.डी.एस. प्रणालीवर उपलब्ध करुन दिलेली आहे.

३. त्यानुसार खुद्द विभाग व विभागाच्या अधिपत्याखालील संचालनालयांना सोबत जोडलेल्या विवरणपत्रातील रकाना क्र. ३ मध्ये दर्शविल्याप्रमाणे निधी मंजूर करण्यात येत असून सर्व नियंत्रक अधिकाऱ्यांनी त्यांच्या अधिनस्त कार्यालयांना निधी मंजूर/वितरीत करण्यापूर्वी वित्त विभाग परिपत्रक क्र. अर्थसं-२०१८/प्र.क्र.६९/अर्थ-३, दिनांक ०२ एप्रिल, २०१८ मधील अटी व शर्तीची पूर्तता करावी तसेच या सोबतच्या परिशिष्टामधील अ.क्र. ८ मधील बाबींची पूर्तता करावी. तसेच वित्तीय अधिकार नियम पुस्तिका १९७८ मधील नियमानुसार तसेच याबाबत शासनाने वेळोवेळी निर्गमित केलेल्या मार्गदर्शक सूचनांनुसार अग्रिम मंजूर करावे.

४. या अनुदानाबाबत खर्चमेळाचे काम (Reconciliation) संबंधित नियंत्रक अधिकाऱ्यांनी करणे आवश्यक असून खर्चाचे एकत्रित आकडे या विभागाकडे व मा.महालेखापाल, महाराष्ट्र राज्य-१/२ (लेखा व अनुज्ञेयता), मुंबई/ नागपूर यांना पाठवावेत. त्यांच्याशी संबंधित एकत्रित केलेली सर्व माहिती प्रपत्रामधून भरुन या विभागाकडे पाठवावी. तसेच संचालकांच्या नियंत्रणाखालील कोणत्याही कार्यालयाने खर्चमेळाची माहिती परस्पर शासनाकडे पाठवू नये, अशा सूचना संचालकांनी परस्पर द्याव्यात. प्रपत्रात मंजूरीचा आदेश क्रमांक व दिनांक तसेच अग्रिम काढल्याचा प्रमाणक क्रमांक व दिनांक, कोषागाराचे नांव इत्यादी तपशिलाचा अंतर्भाव केलेला असावा.

५. खर्चमेळाचे बाबतीत वेळोवेळी लोकलेखा समितीला उत्तर द्यावे लागत असल्यामुळे याबाबत योग्य ती खबरदारी सर्व संचालनालयांनी घ्यावी.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

( गी.नि.चव्हाण )
कक्ष अधिकारी, महाराष्ट्र शासन

*सोबत : विवरणपत्र*

प्रति,

महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता / लेखा परीक्षा), १/२, मुंबई/नागपूर
अधिदान व लेखाधिकारी, मुंबई
निवासी लेखा परीक्षा अधिकारी, मुंबई
सर्व सहसचिव/उपसचिव, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई
संचालक, उच्च शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, पुणे,
संचालक, तंत्र शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई,
संचालक, कला संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई,
संचालक, ग्रंथालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई
अवर सचिव (साशि-२) उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई
कक्ष अधिकारी, (आस्था-१)/(रोखशाखा), उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई
कक्ष अधिकारी, (व्यय-५ / अर्थसंकल्प-८) वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई.
सर्व जिल्हा कोषागार अधिकारी.
निवड नस्ती, साशि-१